# मुखवटे आणि चेहरे भाईचे, बाबाचे, खानचे

**विशेष संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडे कृत**

सामान्य माणसं साधीभोळी असतात. राजकारण्यांपासून कलाकारांपर्यंतच्या व्यक्तिमत्त्वांचे खरे चेहरे वारंवार डोळ्यांसमोर झळकतात, पण सामान्य माणूस मुखवट्यावरच भाळतो आणि त्यालाच हृदयात स्थान देतो. सलमान खान, संजय दत्त आणि शाहरूख खान ही अगदी अलीकडची अशी तीन ठसठशीत उदाहरणं आहेत.

शाहरूख खान गडगंज श्रीमंत आहे, पण वांद्र्याला त्याने जेव्हा 'मन्नत' बंगला बांधला तेव्हा बंगल्याच्या शेजारचा रस्ताच त्याने हडप केला. कुणाची वाहनंच तो येऊ देईना. त्यानंतर वानखेडे स्टेडियमवर त्याने दारूच्या मस्तीत सुरक्षा रक्षकाला मारलं. या दोन घटना आपणा सर्वांना माहीत आहेत. यातून खरा शाहरूख कसा असेल याचा अंदाज येऊ शकतो, पण तरीसुद्धा आपल्यासाठी तो 'खान भाई' आहे. त्याची विमानतळावर तपासणी झाली तर आपण हळहळतो. त्याचं जे सत्य आपल्याला दिसतेय ते आपण मान्य करायलाच तयार नाही. संजय दत्त तर फार मोठा गुन्हेगार आहे. लहानपणी मादकद्रव्याच्या सेवनामुळे त्याचे अख्खे कुटुंब चिंताग्रस्त होते. त्यानंतर मुंबईत दंगली घडविण्यासाठी आणलेला शस्त्रसाठ्याचा ट्रक त्याच्या बंगल्यात थांबला आणि त्याने त्यातील तीन बंदुका घेतल्या. ट्रकभर शस्त्रसाठा कशाला आणला हे त्याला माहीत होते तरीसुद्धा तो गप्प बसला. संजय दत्तने अंडरवर्ल्ड डॉनशी केलेली संभाषणंही आपण ऐकली. इतके सर्व करूनही या खलनायकाच्या मागे संजूबाबा, संजूबाबा करीत आपण धावत सुटतो.

सलमानची तीच गत आहे. तो 'बिईंग ह्युमन' नावाची ट्रस्ट चालवतो आणि त्यातून मिळालेल्या रकमेचा दानधर्म करतो, असे आपल्याला लोक सांगतात. आपण लगेच त्यावर विश्वास ठेवतो. परंतु प्रत्यक्षात तो ट्रस्ट स्थापून हजारो दुकानं उघडून कोट्यवधींची कमाई करतो आहे. 'बिईंग ह्युमन' म्हणून सहानुभूती मिळवायची आणि कपडे विकायचे. हे म्हणजे चोराने गळ्यात रुद्राक्षाची माळ घालून बाबा बनण्याचा प्रकार आहे. हा सलमान खान त्याच्या गाडीखाली गरिबांना चिरडतो, त्यातील साक्षीदारांना धमकावतो, इतके पैसे चारतो की त्याच्या विरोधात साक्ष देणाऱ्या बॉडीगार्डची साक्ष शेवटपर्यंत न्यायालयात नोंद केली जात नाही. हा सलमान मुक्या जनावरांची शिकार करीत फिरतो. या खटल्यांतून तो निर्दोष सुटतो. इतकं की, ज्या गाडीखाली गरीब चिरडले ती गाडी कुणी चालवली, हे आजवर माहीत नाही. हा सलमान इतक्या गोष्टी मॅनेज करतो तरीसुद्धा तो सल्लूभैय्या कसा? पैसे चारायचे, धमकावायचे, त्याच्या बॉडीगार्डने मारहाण करायची हे त्याचे रोजचे किस्से आहेत. तरीही सलमान दयाळू? ऐश्वर्या रायला याच सलमानने प्रचंड छळलं, हेही विसरायचं? अशांना शिक्षा झालीच पाहिजे असे न म्हणता आपल्याला त्यांचा पुळका येतो. त्यांनी जे गुन्हे केलेत ते एखाद्या सामान्य माणसाने केले तर आपण त्याला तर जगू देणार नाहीच, पण त्याच्या कुटुंबाला टोमणे मारून मारून हैराण करू.

सलमान खान, शाहरूख खान, संजय दत्त हे अभिनयात बेजोड आहेत. चित्रपटगृहांत त्यांचे चित्रपट पाहायचे आणि तिथेच त्यांना सोडून बाहेर यायचे. ही माणसं जीवनातील 'आदर्श' नाहीत आणि कधी ठरूही नयेत.